॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी नेहमी प्रयत्न करा

■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ५४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत

# पोर्टलवरील रक्कमच अंतिम राहणार

### राज्याचे सहकार आयुक्त आणि निबंधक (सहकारी संस्था) दीपक तावरे यांची माहिती

**● पुणे । वीरभूमी –**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेतील गावपातळीवर प्रसिध्द झालेल्या याद्यांमध्ये व्यापारी बँकांमधील एनपीए खातेदार शेतकऱ्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या थकबाकी रक्कम तसेच योजनेच्या पोर्टलवरील रकमेत फरक असल्याचे निदर्शनास आले आहे. गाव पातळीवर प्रसिद्ध केलेली यादी व योजनेच्या पोर्टलवरील शेतकऱ्यांच्या थकबाकी रकमेत फरक असल्यास योजना पोर्टलवरील थकबाकीची रक्कम ग्राहय धरावी, असे राज्याचे सहकार आयुक्त आणि निबंधक (सहकारी संस्था) दीपक तावरे यांनी सांगितले.

योजनेच्या पोर्टलवर दिसणारी शेतकऱ्यांच्या कर्जाची थकबाकीची रक्कम ३१.३.२०२६ रोजीची आहे. शासनाने १.७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व बँकांना १.४.२०२६ नंतरच्या व्याजाची रक्कम न आकारण्याच्या सूचना दिलेल्या आहेत व सर्व बँकांनी त्या मान्य असल्याचे लेखी कळविले आहे. शेतकऱ्यास योजनेच्या पोर्टलवर दिसणारी रक्कम मान्य असल्यास त्यांनी आधार प्रमाणीकरण करावे. आधार प्रमाणीकरण केल्यानंतर शेतकऱ्यास आधार प्रमाणीकरण यशस्वी झाल्याची पावती प्राप्त होणार आहे. या पावतीमध्ये शेतकऱ्याची कर्जमुक्ती होणाऱ्या रकमेची माहिती उपलब्ध आहे.

आधार प्रमाणीकरण केल्यानंतर शेतकऱ्यांचे दिनांक ३१.०३.२०२६ वरील कर्जबाकीच्या लाभाची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात डीबीटीद्वारे जमा केली जाणार आहे. उपरोक्त कर्जमुक्तीनंतर शेतकऱ्यास कर्ज बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कर्जमुक्ती झाल्यानंतर सर्व कर्जमुक्ती शेतकऱ्यांच्या याद्या संबंधित बँकेच्या शाखेत व विविध कार्यकारी सेवा संस्थांमध्ये लावण्यात येतील. कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या सर्व




शेतकऱ्यांना संबंधित बँकेमार्फत खरीप पीक कर्जाची उपलब्धता होणार आहे.

योजनेच्या पोर्टलवरील रक्कम किंवा पोर्टलवरील शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत इतर कोणताही तपशील शेतक–यास अमान्य असल्यास त्याने पोर्टलवर तक्रारीची नोंद करावी. या तक्रारीचे निराकरण जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीमार्फत केले जाईल.

### कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध

■ कर्जमाफी व एकवेळ समझोता घटकाकरिता योजनेच्या पोर्टलवर बँकांनी एकूण ३१.१७ लाख कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. बँकेमार्फत सादर केलेल्या कर्जखात्यांचे महा–आयटी मार्फत योजना निकषानुसार संगणकीय संस्करण करून २५ जुलै २०२६ रोजी एकूण १६.९६ लाख कर्जखात्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडील ७.०३ लाख कर्जखाती व व्यापारी बँकांकडील ९.९३ लाख कर्जखात्यांचा समावेश आहे.

## SPOT NEWS

### पेपर लिक विधेयक राज्यसभेतही मंजूर

**● नवी दिल्ली –** लोकसभेनंतर राज्यसभेतही पेपर लिक विरोधी दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले आहे. सुमारे आठ तास चाललेल्या प्रदीर्घ चर्चा आणि वादविवादानंतर हे विधेयक आवाजी मतदानाने राज्यसभेत संमत झाले. आता हे विधेयक अंतिम संमतीसाठी राष्ट्रपतींकडे पाठवले जाणार असून, त्यांच्या मंजुरीनंतर त्याचे अधिकृत कायद्यात रुपांतर होईल. या विधेयकावरील चर्चेदरम्यान राज्यसभेत जोरदार राजकीय वाद पाहायला मिळाला. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या मुद्यावरून सरकारवर घणाघाती टीका केली आणि या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राजीनामा द्यावा, अशी तीव्र मागणी लावून धरली. तसेच आरजेडी खासदार मनोज झा यांनी राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या (एनटीए) कार्यपद्धतीवर कडक शब्दांत ताशेरे ओढत ही संस्था रद्द करण्याची आणि तिला बंगालच्या उपसागरात फेकून देण्याची मागणी केली. राज्यसभेतील कामकाजादरम्यान विरोधी पक्षाचे खासदार जॉन ब्रिटास, ए. ए. रहीम, हरीश बीरन आणि संतोष कुमार यांनी विधेयकातील काही कलमांमध्ये दुरुस्तीसाठी नोटिसा सादर केल्या होत्या, तर पी. विल्सन आणि तिरुची शिवा यांनीही काही दुरुस्त्या सुचवल्या होत्या. परंतु, या दुरुस्त्या सभागृहात मंजूर होऊ शकल्या नाहीत.

### आंदोलकांवर कारवाई होणार नाही

**● नवी दिल्ली –** दिल्लीतील जंतरमंतरवर नीट पेपरफुटी प्रकरणी करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावेळी आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आला. यावेळी पोलिसांनी बळाचा वापर करत विद्यार्थ्यांना मारहाण केली. लाठीचार्ज, अश्रूधुराच्या नळकांड्याही फोडल्या. त्यामुळे येथे हिंसाचार झाल्याचे देशाने पाहिले. अखेर आंदोलनकर्त्यांनी मागणी मान्य करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आंदोलन मागेही घेण्यात आले. मात्र, आंदोलक विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल झाले, काहींना ताब्यात घेण्यात आले तर काहींना अटक झाली. आता केंद्रीय गृहमंत्रालयाने महत्त्वाचा आदेश जारी केला आहे. आंदोलकांवर कुठलाही कायदेशीर कारवाई होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आलंय.

### महापुरुषांविषयी सोशल मिडियावर आक्षेपार्ह टिप्पणी; संबधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी–**
सोशल मीडियावर महापुरुषां विषयी कथित आक्षेपार्ह व अवमानकारक टिप्पणी केल्याचा आरोप करत पाथर्डी तालुक्यातील निवडुंगे येथील एका युवकाविरुद्ध कारवाईची मागणी करण्यात आली आहे. याप्रकरणी आकाश इंद्रजीत शिंदे (रा. निवडुंगे) यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे.

यानुसार, २९ जुलै २०२६ रोजी दुपारी फिर्यादी घरी असताना त्यांच्या नातेवाईकाने मोबाईलवर सोशल मीडियावरील एका पोस्टचा स्क्रीनशॉट पाठवून माहिती दिली. संबंधित पोस्टमध्ये महापुरुषांच्या विषयी आक्षेपार्ह व अवमानकारक मजकूरासह टिप्पणी करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. ही पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित झाल्याने समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

त्यानंतर फिर्यादी व त्यांच्या सहकाऱ्यांनी संबंधित इंस्टाग्राम आयडीची माहिती घेतली असता तो आयडी निवडुंगे येथील नवनाथ भीमाजी ससे यांचा असल्याचे समोर आल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे. संबंधित व्यक्तीने जाणूनबुजून महामानवाबाबत अवमानकारक टिप्पणी करून समाजाच्या भावना दुखावल्या असून समाजात तेढ निर्माण करण्याचा तसेच सार्वजनिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी आकाश शिंदे यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत केली आहे. दरम्यान, या प्रकरणाचा तपास पाथर्डी पोलीस करत असून फिर्यादीतील आरोपांची शहानिशा करून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## मतदार, आधार, पॅन नागरिकत्वाचे पुरावे नाहीत

**● कोलकाता । वीरभूमी –**
मतदार ओळखपत्र, आधार आणि पॅन कार्ड हे भारतीय नागरिकत्वाचे निर्णायक पुरावे नाहीत, असे कोलकाता उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ही कागदपत्रे भारतीय नागरिकत्व निश्चितपणे सिद्ध करत नाहीत असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

सुमन मोल्ला या व्यक्तीने दाखल केलेल्या बंदी–प्रत्यक्षीकरण याचिकेवर न्यायमूर्ती देबांगसू बसाक आणि न्यायमूर्ती अजय कुमार गुप्ता यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. मोल्ला यांचा दावा होता की पश्चिम बंगालमधील विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून नाव वगळल्यानंतर त्यांचा पुतण्या नासिर याला डिटेन्शन कॅम्पमध्ये पाठवण्यात आले होते; या कारवाईविरुद्धचे अपील अद्याप प्रलंबित होते. नासिरचे मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि बँक पासबुक यांचा दाखला देत, याचिकाकर्त्याने असा युक्तिवाद केला की तो परदेशी नागरिक नसून भारतीय नागरिक आहे.

न्यायालयाने नमूद केले की, मतदार ओळखपत्र केवळ संबंधित व्यक्तीचा मतदार यादीत समावेश होता हे दर्शवते; तसेच, एसआयआर प्रक्रियेदरम्यान नासिरचे नाव वगळण्यात आले होते. न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, केवळ बँक खाते उघडणे हा भारतीय नागरिकत्वाचा पुरावा मानला जाऊ शकत नाही. न्यायालयाने म्हटले, याचिकाकर्ता आणि स्थानबद्ध व्यक्ती हे स्थलांतर आणि परदेशी नागरिक कायदा अंतर्गत आवश्यक पुरावे सादर करण्याची जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरले आहेत. याचिकाकर्ता किंवा स्थानबद्ध व्यक्ती यांपैकी कोणीही नासिरचे भारतीय नागरिकत्व सिद्ध करू शकले नाही, असे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने प्रशासनाच्या निर्णयामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला आणि बंदी–प्रत्यक्षीकरण याचिका फेटाळून लावली. खंडपीठाने सांगितले की, गृह मंत्रालयाच्या २ मे २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार १८ जून २०२६ रोजी नासिरला ताब्यात घेण्यात आले होते आणि तो अजूनही स्थानबद्धता केंद्रात आहे.

परिपत्रकानुसार स्थानबद्ध व्यक्तीला भारतीय नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी ६० दिवसांची मुदत दिली जाते. न्यायालयाने नोंदवले की, २० जुलै रोजी निकाल लागेपर्यंत नासिर नागरिकत्व सिद्ध करणारा कोणताही दस्तऐवज सादर करू शकला नाही. सुनावणीदरम्यान, नासिरने दावा केला की त्याचे आई–वडील भारतातच मरण पावले होते. मात्र, न्यायालयाने म्हटले की, जरी नासिरने त्याचे आई–वडील भारतात मरण पावल्याचा दावा केला असला, तरी त्यांना कुठे दफन करण्यात आले होते हे तो सांगू शकला नाही. खंडपीठाने म्हटले, आम्ही संबंधित व्यक्तीच्या आई–वडिलांविषयी माहिती मागवली होती, जेणेकरून याचिकाकर्त्याच्या संमतीने त्यांच्या पार्थिवावर डीएनए चाचणी करता येईल आणि संबंधित व्यक्तीचे आई–वडील खरोखरच भारतात होते हे सिद्ध करता येईल.

# नाशिक महानगरपालिकेच्या धर्तीवर जलतरण तलाव विकसित करा

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा क्रीडा परिषदेची बैठक संपन्न

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
जलतरण तलावाचा वापर केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न ठेवता, त्यातून दर्जेदार जलतरणपटू घडविणे आवश्यक आहे. यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या धर्तीवर जलतरण तलाव विकसित करावा. तसेच जलतरण तलावाचे संचालन बाह्य यंत्रणेकडे सोपवून खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

जिल्हा क्रीडा परिषदेची बैठक जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी संपन्न झाली. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी संगीता जगताप, तालुका क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, प्रा. श्रीकांत निंबाळकर, सुनील जाधव तसेच महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि शिक्षण विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सन्मान करण्यात यावा. अशा खेळाडूंना क्रीडा पोशाखांचे वितरण करण्यात यावे. तसेच त्यांच्यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करावे, असे डॉ. आशिया यांनी सांगितले. त्यामुळे खेळाडूंचे मनोबल उंचावण्यास मदत होईल आणि त्यांना पुढील वाटचालीस प्रोत्साहन मिळेल, असेही त्यांनी नमूद केले.

मागील काही वर्षांपासून खेळाडूंना क्रीडा प्रमाणपत्रे वितरित करण्याची प्रक्रिया प्रलंबित आहे. ही प्रमाणपत्रे खेळाडूंना सुलभपणे उपलब्ध व्हावीत, यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करावे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून खेळाडूंना त्यांची क्रीडा प्रमाणपत्रे उपलब्ध होतील. तसेच खेळाडूंची माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक माहिती साठवणूक प्रणाली उपलब्ध करावी, असे त्यांनी सांगितले.

तालुका स्तरावरील क्रीडा संकुलांच्या प्रश्नांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. शेवगाव व पाथर्डी येथे क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध नसल्याची, तर राहुरी येथे जागा उपलब्ध असूनही काही अडचणी असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या ठिकाणांवरील प्रलंबित




प्रश्न तातडीने निकाली काढून क्रीडा संकुलांची कामे मार्गी लावावीत, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

क्रीडा संकुलांच्या विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून घेणे तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा संबंधित कार्यान्वयन यंत्रणेमार्फत ही कामे विहित मुदतीत पूर्ण करावीत. खेळाडूंना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

# SPOT NEWS

## गुरुपौर्णिमेनिमित्त सनबीम्स प्री-प्रायमरीची रंगली संस्कारमय बालदिंडी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

कर्नल परब संचलित सनबीम्स प्री–प्रायमरी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि गुरुजनांविषयी आदरभाव रुजविण्याच्या उद्देशाने गुरुपौर्णिमा निमित्त संस्कारमय बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीच्या माध्यमातून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थ्यांचा उत्साह, टाळ–मृदंगाचा निनाद आणि 'विठ्ठल... विठ्ठल...'च्या अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. भारतीय संस्कृतीमध्ये गुरुला सर्वोच्च स्थान असून, विद्यार्थ्यांच्या मनात गुरुंचे महत्त्व लहानपणापासूनच रुजावे तसेच गुरुजनांविषयी आदर, कृतज्ञता आणि संस्कारांची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हस्ते कर्नल परब स्कूलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ), गीता दिलीप परब, यांचे विधिवत गुरुपूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी गुरुंच्या चरणी नतमस्तक होत त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला. शिलाविहार रोड येथील सनबीम्स प्री–प्रायमरी शाळेपासून बालदिंडीला उत्साहात प्रारंभ झाला. दिंडीने परिसरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करून विठ्ठल–रुक्मिणी मंदिरापर्यंत प्रस्थान केले. दिंडीत सहभागी झालेल्या चिमुकल्यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडविणारी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. हातात टाळ, मृदंग आणि भगवे पताके घेऊन 'ज्ञानोबा–तुकाराम', 'विठ्ठल... विठ्ठल...' अशा नामघोषात विद्यार्थ्यांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगविला. दिंडीचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनीही रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. या दिंडीत विद्यार्थ्यांसोबत शिक्षक, पालक आणि परिसरातील नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. चिमुकल्यांचा निरागस उत्साह आणि शिस्तबद्ध सहभाग पाहून उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले. दिंडीमुळे विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, भक्ती, गुरु–शिष्य नाते आणि भारतीय संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

## पेन्शनर असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी एन. एम. पवळे

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्हा पेन्शनर असोसिएशनची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी जुनी कार्यकारिणी बरखास्त करून नव्या पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली. बैठकीत पेन्शनधारकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. नवीन कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी एन. एम. पवळे, उपाध्यक्षपदी वसंत थोरात व मिलिंद वैद्य, कार्याध्यक्षपदी डी. यू. देशमुख, खजिनदारपदी डी. एम. टेपाळे, सहखजिनदारपदी आर. जी. शेख, चिटणीसपदी आर. के. गावडे तर सरचिटणीसपदी मधुकर खताळ यांची एकमताने निवड करण्यात आली. याशिवाय सल्लागार म्हणून रमेश शहा, एस. एस. परशुरामी, रवींद्र गणगले, दिलीप पाठक, लक्ष्मण जगताप आणि अन्वर शेख यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून नंदू ढापसे, मुठाळ, सतीश वाघ, पेरणे, अनिल पठाण, वाखारे, नवनाथ भालेराव, वसंत गायकवाड, बाबा डवरे, श्रीमती वाघ, शांताबाई शेकटकर, पेटारेबाई आणि द्वारका किंगर यांची निवड करण्यात आली. बैठकीत निवृत्त कर्मचारी व पेन्शनधारकांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी, महागाई भत्ता, आरोग्य सुविधा, कौटुंबिक पेन्शन, कार्यालयीन कामकाजातील विलंब, शासन निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करून पेन्शनरांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटना अधिक सक्रियपणे कार्य करेल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# पुणतांबा येथील त्र्यंबकेश्वर महादेव मंदिरातील शिलालेख

## मराठा कालखंडाच्या इतिहासाचा विश्वसनीय दस्तऐवज

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

गोदावरी नदीच्या पवित्र तीरावरील श्रीक्षेत्र पुणतांबा हे धार्मिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेले प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. येथील कार्तिकस्वामी मंदिरालगत असलेल्या श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावरील गणेशपट्टीखाली कोरलेला शिलालेख अठराव्या शतकातील धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि स्थापत्य इतिहासाचा महत्त्वपूर्ण प्राथमिक पुरावा म्हणून अभ्यासकांचे लक्ष वेधून घेत आहे.

सुमारे दीड फूट बाय दीड फूट आकाराच्या दगडी शिळेवर कोरलेला हा सहा ओळींचा शिलालेख देवनागरी लिपीत असून त्याची भाषा शुद्ध मराठी आहे. अक्षरांची उंची सुमारे चार सेंमी असून शिलालेख आजही सुस्थितीत आहे. बहुतांश अक्षरे स्पष्ट आणि सहज वाचनीय आहेत. मात्र, मंदिरावर करण्यात आलेल्या रंगरंगोटीमुळे काही ठिकाणी अक्षरांचे नुकसान होऊ लागल्याचे दिसून येते. त्यामुळे या ऐतिहासिक ठेव्याचे वैज्ञानिक पद्धतीने संवर्धन करणे आवश्यक असल्याचे अभ्यासकांचे मत आहे.

शिलालेखातील मूळ मजकूर पुढीलप्रमाणे आहे–



वाचन : १. ।। श्री गणेशायनमाः स२. के १६९७ ईश्वर नाम सं३. वत्सरे ज्येष्ठ शुद्ध त्रयोद४. शी परशुराम रामचं५. द्र पटवर्धन यांनी दे६. वालय करविले ।।

या शिलालेखावरून शालिवाहन शक १६९७, ईश्वर नाम संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी अर्थात ३१ मे १७७५ (मंगळवार) या दिवशी श्री परशुराम रामचंद्र पटवर्धन यांनी श्रीक्षेत्र पुणतांबा येथे गोदावरी नदीच्या तीरावर श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिराची उभारणी केल्याची नोंद आढळते. प्रारंभी श्रीगणेशाचे मंगलाचरण करण्यात आले असून तत्कालीन धार्मिक परंपरा आणि श्रद्धेचे दर्शनही या लेखातून घडते.

इतिहास संशोधनाच्या दृष्टीने हा शिलालेख अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मंदिराच्या स्थापनेचा अचूक काल निश्चित करण्यासाठी तो आधारभूत पुरावा ठरतो. मराठा कालखंडातील मंदिरनिर्मितीची परंपरा, धार्मिक संस्थांना मिळालेला आश्रय, दानशूर व्यक्तींचे योगदान तसेच तत्कालीन समाजजीवनाचा अभ्यास करण्यासाठी हा शिलालेख उपयुक्त ठरतो.

भाषाशास्त्रीय दृष्टीनेही हा लेख महत्त्वाचा आहे. देवनागरी लिपीतील मराठी भाषेचे तत्कालीन स्वरूप, शब्दप्रयोग, लेखनशैली आणि भाषिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यासाठी तो विश्वसनीय स्रोत मानला जातो. मराठी शिलालेखांच्या उत्क्रांतीचा मागोवा घेताना या लेखाला विशेष स्थान प्राप्त होते.

पुरातत्त्वीय दृष्टिकोनातून हा शिलालेख मंदिराच्या मूळ स्थापनेची साक्ष देतो. मंदिराच्या वास्तुशैलीचा, बांधकामाच्या कालखंडाचा तसेच पुढील जीर्णोद्धाराच्या टप्प्यांचा अभ्यास करताना त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रवेशद्वारावरील हा लेख मंदिराच्या स्थापत्याचा अविभाज्य घटक असून त्याकडे केवळ लेखनस्रोत म्हणून नव्हे, तर सांस्कृतिक वारशाचा मौल्यवान भाग म्हणून पाहिले जाते.

आजही सुस्थितीत असलेला हा शिलालेख जतन आणि संवर्धनाची अपेक्षा करीत उभा आहे. रंगरंगोटीमुळे अक्षरांचे नुकसान होत असल्याने संबंधित विभागाने वैज्ञानिक पद्धतीने त्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे. श्रीक्षेत्र पुणतांबा, गोदावरी खोरे आणि मराठा कालखंडातील धार्मिक–सांस्कृतिक इतिहासाचा हा एक अमूल्य दस्तऐवज असल्याचे इतिहास अभ्यासकांचे मत आहे.

या शिलालेखाचे संशोधन माहिती संकलन व वाचन पुणे येथील अनिल दुधाणे यांनी केले आहे तर त्यांना शिवदुर्ग फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश इंगळे यांनी सहकार्य केले.

## शेवगावला गुरुपौर्णिमा भक्तीभावाने साजरी; ७५ लाख रुपये खर्चाच्या भक्तिनिवास कामाचा शुभारंभ



■ छाया । अमोल कराळे

**● शेवगाव । वीरभूमी–**

येथील गुरुदत्त सामाजिक संस्था संचलित वैशंपायन नगरमधील दत्त देवस्थानात गुरुपौर्णिमा मंगलमय वातावरणात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून ७५ लाख रुपये खर्चाच्या भक्तीनिवास बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. गुरुपौर्णिमेच्या शुभ पर्वणीला सकाळी साधक समूहाच्या वतीने मंत्रपठण करण्यात आले. अष्टांग योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांच्या तेजस्वी संगमरवरी मूर्तीवर व श्री स्वामी समर्थांच्या चांदीच्या पादुकांवर मंत्रघोषात अभिषेक घालण्यात आला. तुकाराम चिक्षे गुरुजी यांनी पौरोहित्य केले. दत्त जयंती डिसेंबर २०२५ संकल्पित योगतज्ञ प.पू. दादाजी वैशंपायन यांनी देवभूमी हिमालयात सिद्ध केलेल्या ओम आनंदम् हिमालयम्...या मंत्राच्या जपाची गुरुपौर्णिमेला संकल्पपूर्ती झाली. साधक समूहाच्या वतीने ४ लाख ४२ हजार जप पूर्ण करण्यात आला. अहिल्यानगरचे ज्येष्ठ साधक सुधाकर दामले यांनी सर्वाधिक ११६३ जपमाळेच्या माध्यमातून १ लाख २५ हजार ४९६ जपपूर्ती केल्याबद्दल त्यांचा संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके यांच्या हस्ते दत्त प्रतिमा व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सचिव फुलचंद रोकडे, सेवेकरी संजय कुलकर्णी, ज्येष्ठ साधक हनुमान जोशी, पी. बी. शिंदे, ओमप्रकाश बाहेती, सुरेश घुले, जगन्नाथ गोसावी, लक्ष्मण काळे, योगेश तायडे, निवृत्ती गोरे, गजेंद्र राजेभोसले, बन्सी पांगरे, बंडू भोर, महेश देशमुख, लक्ष्मण ज्योतीक, मुकुंद शेळके, गणेश गोसावी, मुकुंद गाडेकर तसेच नगरसेवक इंजि. निलेश रोकडे, इंजि. सागर आधाट, मिस्तरी गोपीचंद सोरमारे आदी उपस्थित होते. आरतीनंतर प्रसाद भोजनाने उत्सवाची सांगता झाली.

# गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा मिळते

## सोनल शहा । शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूल येथे गुरुपौर्णिमा साजरी

**● शेवगाव । वीरभूमी–**

विद्यार्थी जीवनात शिस्त, संस्कार आणि चांगल्या मूल्यांची जोपासना ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा मिळते. मोबाईलचा अतिरेक टाळून नियमित अभ्यास, योग्य वेळेचे नियोजन आणि अवांतर वाचनाची सवय लावल्यास विद्यार्थी सर्वांगीण प्रगती साधू शकतो असे प्रतिपादन गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी केले.



■ छाया । अमोल कराळे

शेवगाव येथील प्रवरा मेडिकल ट्रस्ट संचलित डॉ. बाळासाहेब विखे पाटील सी.बी. एस.ई. स्कूल व शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूल येथे गुरु पौर्णिमा व सरस्वती मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सोहळा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सोनल शहा व बाळासाहेब भारदे हायस्कूलचे उपप्राचार्य उमेश घेवरीकर यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या वर्षा दारकुंडे, उपप्राचार्य विजय चन्ने, शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूलचे उपप्राचार्य रमेश कवडे आदी प्रमुख उपस्थित होते. प्रवरा शैक्षणिक संकुल, शेवगावचे कार्यकारी संचालक डॉ. पंजाबराव आहेर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी घेवरीकर म्हणाले की, गुरू हे केवळ ज्ञानदान करणारे नसून विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे प्रेरणास्थान असतात. प्रत्येक विद्यार्थ्याने गुरुजनांचा आदर राखून प्रामाणिकपणे अभ्यास करावा, वेळेचे महत्त्व ओळखावे आणि सकारात्मक विचारांच्या बळावर आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी. परिश्रम, सातत्य आणि संस्कार यांच्या बळावरच जीवनात यश संपादन करता येते.

याप्रसंगी शहा व घेवरीकर या प्रमुख पाहुण्यांचा तसेच शिक्षकांचा डॉ. पंजाबराव आहेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या वर्षा दारकुंडे यांनी तर सूत्रसंचालन संदीप गाढे व उज्वला राठोड यांनी केले. पल्लवी सुपारे यांनी आभार मानले.

# न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज पारनेर येथे वृक्षारोपणाने 'सुवर्ण महोत्सवी' वर्षाचा दिमाखदार शुभारंभ

**● पारनेर । वीरभूमी –**

पारनेर येथील प्रख्यात न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा दिमाखदार व पर्यावरणपूरक प्रारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला. 'केवळ वृक्षारोपण नव्हे, तर वृक्षसंवर्धन' हा निसर्गरक्षणाचा ठाम संदेश देत या प्रसंगी महाविद्यालय परिसरात विविध जातींच्या तब्बल ४० पारंपरिक वृक्षांच्या रोपांची यशस्वी लागवड करण्यात आली. या उपक्रमाने सुवर्ण महोत्सवी वर्षारंभाची सुरुवात एका अत्यंत स्तुत्य आणि सामाजिक उपक्रमाने केली आहे.

या विशेष हरित मोहिमेमध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना या दोन्ही विभागांच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत सक्रिय आणि उत्साही सहभाग नोंदवला. पर्यावरणाला अनुकूल ठरणाऱ्या आणि परिसराची शोभा वाढवणाऱ्या वनस्पतींची या वेळी निवड करण्यात आली.

या मोहिमेंतर्गत खालील वृक्षांची लागवड करण्यात आली छायादायी व औषधी वनस्पती कडुनिंब, करंजी, बहावा, कदंब आणि सिल्व्हर ओक. याप्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी मोलाचे विचार मांडले. ते म्हणाले, आजच्या काळात वृक्षसंवर्धन ही अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. केवळ एक दिवस झाड लावून आपले कर्तव्य संपत नाही, तर आपण लावलेल्या प्रत्येक झाडाची वर्षानुवर्षे काळजी घेतली गेली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने वृक्षसंवर्धन होईल आणि आपला निसर्ग समृद्ध होईल.

आजच्या बदलत्या हवामानावर आणि बिघडलेल्या पर्जन्यचक्रावर चिंता व्यक्त करत त्यांनी सांगितले की, निसर्ग पूर्वपदावर आणण्यासाठी वृक्षारोपण आणि त्याचे जतन करणे हाच एकमेव पर्याय आहे. आज रोपण केलेली पारंपरिक झाडे भावी पिढीला शुद्ध हवा, शीतल सावली आणि निरामय आरोग्य देतील. या उपक्रमातून प्रेरणा घेऊन विद्यार्थी आपल्या सभोवतालच्या परिसरात नक्कीच झाडे लावतील आणि ती जोपासतील, असा दृढ विश्वास त्यांनी व्यक्त केला.



■ छाया । भगवान गायकवाड

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या या पहिल्याच उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केवळ मार्गदर्शन न करता प्रत्यक्षात श्रमदान केले. यामध्ये उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे, प्रा. डॉ. दिलीप ठुबे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. हरेश शेळके, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. प्रकाश गावित, प्रा. नितीन निपुंगे, डॉ. माया लहारे एन.सी.सी.चे कॅप्टन प्रा. भरत डगळे या सर्व मान्यवरांनी स्वतः पुढे येऊन खड्डे खोदून व रोपे लावून या उपक्रमात सहभाग घेतला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळाली. पारनेर महाविद्यालयाचा हा उपक्रम संपूर्ण परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

SPOT NEWS

## केडगावच्या सरस्वती विद्यालयात पालक सभा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

केडगाव येथील सरस्वती विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील पहिली पालक सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आयुर्वेदाचार्य डॉ. प्रसाद उबाळे हे होते, तर अध्यक्षस्थानी डॉ. हेडगेवार शिक्षण संस्थेचे सहकार्यवाह डॉ. रवींद्र चोभे उपस्थित होते. यावेळी संस्था समन्वयक डॉ. गोकुळदास लोखंडे, आरोग्य भारतीचे डॉ. राजेश परदेशी, श्रीपाद शिंदीकर, कैलास चोथे आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल झिरपे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर यांनी सांगितले की, शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. यंदाच्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. बदलत्या काळानुसार विद्यालयात बुद्धिमत्ता आधारित अध्यापनाला प्राधान्य देण्यात आले असून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मंथन प्रज्ञाशोध, शिष्यवृत्ती परीक्षा, स्कॉलरशिप, इंडियन नॅशनल ऑलिम्पियाड, नवोदय प्रवेश परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा यांच्या माध्यमातून विद्यालयाचा गुणवत्ता आलेख अधिक उंचावण्यासाठी पालकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता खिलारी यांनी केले, मुख्याध्यापक संदीप भोर यांनी आभार मानले. सभेला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहमदनगर महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांचा इंडक्शन सोहळा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जीवनात यश संपादन करण्यासाठी मोठी स्वप्ने पाहणे, स्वतःचे ध्येय निश्चित करणे आणि त्या ध्येयपूर्तीसाठी सातत्याने प्रामाणिक परिश्रम घेणे अत्यंत आवश्यक आहे. महाविद्यालयीन जीवन हे विद्यार्थ्यांच्या भविष्यातील यशाचा भक्कम पाया असतो. त्यामुळे या कालावधीत शिक्षणाकडे गांभीर्याने पाहत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर देण्याचे आवाहन भा. पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे सचिव विशाल बार्नबस यांनी केले. अहमदनगर महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या नवागत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या इंडक्शन (स्वागत) समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. भा. पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. रजनीश बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी संस्थेचे सचिव विशाल बार्नबस, प्रभारी प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. विलास नाबदे, अहमदनगर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रतुल कसोटे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि मोठ्या संख्येने नवागत विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ख्रिस्तवासी रेव्ह. डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक पारंपरिक नृत्याने उपस्थित विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

## महायुती सरकारच्या पाठपुराव्याला यश

# सिस्पे घोटाळ्यातील मास्टरमाइंडला फिजीमधून अटक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यानंतर मोठी घडामोड

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सिस्पे घोटाळ्याप्रकरणी अनेक दिवसांपासून फरार असलेला आणि या प्रकरणातील मास्टरमाइंड म्हणून तपास यंत्रणांकडून शोध घेतला जात असलेला राहुल श्यामराव काळोखे याला अखेर इंटरपोलच्या मदतीने फिजीमध्ये ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत त्याला भारतात आणण्यात आले असून, मुंबई विमानतळावर त्याला अटक करण्यात आली आहे. या घडामोडीमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या तपासाला महत्त्वाची दिशा मिळाली आहे.






तपासादरम्यान राहुल काळोखे याच्याविरोधात जानेवारी महिन्यात इंटरपोलमार्फत रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली होती. या नोटीसमुळे जगभरातील १९६ देशांच्या कायदा अंमलबजावणी यंत्रणांना त्याचा शोध घेण्यासाठी अधिकृत माहिती पाठविण्यात आली. त्यानंतर तो फिजीमध्ये असल्याची माहिती समोर आल्यानंतर तेथील संबंधित अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेतले आणि भारतात प्रत्यार्पणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय समन्वयानंतर राहुल काळोखे याला भारतात आणण्यात आले. आज दुपारी मुंबई विमानतळावर त्याच्यावर अधिकृतपणे अटकेची कारवाई करण्यात आली. पुढील चौकशीसाठी त्याला संबंधित तपास यंत्रणांच्या ताब्यात देण्यात येणार असून, या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, इतर आरोपींची भूमिका आणि घोटाळ्याचे संपूर्ण जाळे उघड करण्यासाठी त्याची कसून चौकशी होण्याची शक्यता आहे.

या प्रकरणात अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सुरुवातीपासून सातत्याने पाठपुरावा केला. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारशी समन्वय साधत आवश्यक स्तरावर पत्रव्यवहार करून तपास प्रक्रियेला गती मिळावी यासाठी प्रयत्न केले. या पाठपुराव्यानंतर विविध तपास यंत्रणांमधील समन्वय अधिक प्रभावी झाले, त्यातून आरोपीचा माग काढून त्याच्यापर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

ही कारवाई यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस, केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), केंद्रीय गृह मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय, इमिग्रेशन विभाग आणि इंटरपोल या सर्व संस्थांनी परस्पर समन्वय साधत काम केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील माहितीची देवाणघेवाण, कायदेशीर प्रक्रिया आणि सुरक्षा यंत्रणांचा समन्वय यामुळे आरोपीला भारतात आणणे शक्य झाले.

राहुल काळोखेच्या अटकेनंतर सिस्पे घोटाळ्यातील तपास अधिक वेगाने पुढे जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणामुळे आर्थिक फटका बसलेल्या हजारो पीडितांना न्याय मिळण्याची आशा पुन्हा निर्माण झाली आहे. तसेच या घोटाळ्यात सहभागी असलेल्या इतर आरोपींची भूमिका, आर्थिक व्यवहारांचे धागेदोरे आणि संभाव्य नवीन खुलासे तपासातून समोर येण्याची शक्यता असल्याने या प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

## 'रयत' शिक्षण संस्थेचे ऋण कधीही विसरणार नाही : प्रा. दिनकर मगर



■ छाया । विजय उंडे

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे ज्येष्ठ शिक्षक प्रा. दिनकर मगर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त भावपूर्ण निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे उपस्थित होते. यावेळी प्रा. मगर यांच्या २८ वर्षांहून अधिक काळाच्या शिक्षणसेवेचा गौरव करण्यात आला. त्यांनी विद्यालयाच्या विकासासाठी २१ हजारांची देणगी दिली. मनोगतात त्यांनी, रयत शिक्षण संस्थेने मला भरभरून प्रेम, आपुलकी आणि सन्मान दिला. हे ऋण मी कधीही विसरणार नाही, अशी भावना व्यक्त केली.

समारंभास संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, कुटुंबीय, माजी विद्यार्थी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर साबळे व विजया शेलार यांनी केले, तर आभार सुनीता काकडे यांनी मानले.

## गुरु आज्ञेने केलेले मार्गक्रमण जीवनाचे कल्याण साधतात : माधव बाबा

**● पाथर्डी । वीरभूमी–**

लौकिक, आध्यात्मिक व भौतिक जीवनामध्ये गुरु एवढे महत्त्वाचे स्थान अन्य कुणाचे नाही सहवासातील प्रत्येकाचे आत्मकल्याण साधने हाच उद्देश ठेवून गुरूकडून उपदेश केला जाऊन ईश्वरत्व प्राप्त करून देण्याची शक्ती गुरुमध्ये आहे असे मत शंकर महाराज मठाचे संस्थापक माधव बाबा यांनी व्यक्त केले.



■ छाया । अनिल खाटेर

गुरुपौर्णिमेनिमित्त शंकर महाराज मठामध्ये राज्याच्या विविध भागातून आलेल्या भाविकांनी गुरुपूजन सोहळा पारंपारिक उत्साहात व अत्यंत श्रद्धापूर्वक अंतकरणाने संपन्न केला. यानिमित्ताने मठामध्ये दिवसभर विविध कार्यक्रम पार पडले. यंदा प्रथमच नेपाळ राष्ट्रसह गुजरात राज्यातून भाविकांनी हजेरी लावली. अहिल्यानगर, संभाजीनगर, बीड, परभणी, पुणे, सोलापूर, ठाणे, कल्याण, धाराशिव, नासिक, आदी भागातून भाविकांची दिवसभर वर्दळ सुरू होती. शंकर महाराजांचे उपासक व साधक माधव बाबांना शंकर महाराजांचा अवतार मानतात तशी त्यांना अनुभूती सुद्धा येते त्यामुळे मठाला भेट देणाऱ्या साधकांच्या संख्येमध्ये अलीकडील काळात मोठी वाढ झाली आहे. अनेक साधकांना येथील मठाचे स्वप्नदृष्टांत होतात, अशी माहिती साधकांनी गुरुपौर्णिमेनिमित्त भावना व्यक्त करताना दिली.

पाथर्डीकरांचा व शंकर महाराजांचा मोठा ऋणानुबंध आहे. पाथर्डीकरांचे भाग्य आहे, नाथ व वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ पाथर्डी तालुक्यात रोवली गेली. आदिनाथांपासून म्हणजे वृद्धेश्वर पासून सुरू झालेली परंपरा शंकर महाराजांसारख्या अनेक सिद्ध साधकांकडून पुढे चालवली जात आहे. याची जाणीव ठेवूनच सेवा कार्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन माधव बाबांनी केले.

# श्रीगोंद्यात चांगले अधिकारी 'टोळधाड' टोळीमुळे येईनात

### या टोळीच्या जाचाला शिकार झालेल्या अधिकाऱ्यांनी धाडसाने कायद्याचा आधार घेत पुढे येण्याची गरज

■ **विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

तालुक्यात गेल्या दहा वर्षांपासून 'टोळधाड' टोळी सक्रिय असून समाजाभिमुख आंदोलनाचा बुरखा पांघरून त्या आडून अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करण्याचा सपाटा लावला आहे. कुणी म्हणतो मला नवी गाडी घ्यायची, कुणी निवडणुका लढवायच्या म्हणतो. कोणाला घर बांधायचे यासाठी अधिकाऱ्यांना थेट लाखाच्या मागण्या करत या टोळ्या सरकारी कार्यालयात उजळ माथ्याने फिरत आहेत. या 'टोळधाड' टोळीच्या मागणीचा पुरवठा न झाल्याने अनेक अधिकारी त्यांचे शिकार झाले आहेत. अनेकजण खोट्या चौकशीच्या फेऱ्यात अडकले असून या टोळीचा बंदोबस्त करण्यासाठी अधिकाऱ्यांनी धाडसाने पुढे येण्याची गरज निर्माण झाली आहे.



एकेकाळी श्रीगोंदा तालुक्यात नौकरीला येण्यासाठी चढाओढ लागायची. चांगले अधिकारी आल्याने तालुक्यामध्ये रचनात्मक विकासकामे व्हायची. श्रीगोंदा येथे कार्यकारी अभियंता दर्जाचे कार्यालय आहे. कुकडीचा मुख्य कॅनॉल व चाऱ्यांची कामे १९९५ सालानंतर मोठ्या प्रमाणात झाली. समाजसेवेचा बुरखा पांघरणाऱ्या त्याकाळच्या चार दोन जणांनी अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल केले. हे तथाकथित समाजसेवक मोटारसायकलवरून थेट आलिशान गाडीत फिरू लागले. ही अचानक वाढलेली श्रीमंती पाहून नवोदित तरुण त्याकडे आकर्षिले गेले. गेल्या दहा वर्षांत तर या तथाकथित समाजसेवकांचे पेव फुटले. अनेकजण ढोंगीपणाने आंदोलने, उपोषणे करून तथाकथित समाजसेवक बनले. दिवसभर आपल्या भाषणांनी तहसील कार्यालय, पोलिस ठाणे आरडाओरड करून दणाणून सोडायचे. पुढे दोन तीन महिने त्या आंदोलनाच्या जीवावर अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करीत सुटायचे.

समाजसेवेचा बुरखा पांघरल्याने व बुरखा असल्याचे जनसामान्यांच्या लक्षात येत नसल्याने आशेचा किरण म्हणून लोक या आंदोलनाला जमू लागले. अधिकाऱ्यांना जसे यांनी ब्लॅकमेल केले तसे पुढे यांचे आंदोलने अधिकाऱ्यांच्या बरोबर नगरपालिका, विविध स्थानिक संस्थांचे पदाधिकारी साखर कारखानदार यांना टार्गेट करू लागले. ही सुपारी बहाद्दर आंदोलने किंबहुना समाजाच्या लक्षात आली मात्र या तथाकथित समाजसेवक मंडळींनी मढ्याच्या टाळूवरचं लोणी खायचं सोडलं नाही. या तथाकथित समाजसेवकांचा बंदोबस्त होणे यासाठी समाजातील प्रामाणिक घटकांनी पुढे येण्याची गरज आहे.

### पोनि. संजय ठेंगे यांच्या समर्थनार्थ मोर्चा काढण्याच्या हालचाली सुरु!

■ पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या कामाची पद्धत हटके आहे. एक दबंग अधिकारी म्हणून पोलिस वर्तुळात त्यांची ख्याती आहे. मागील तीन वर्षापूर्वी बेलवंडी पोलिस ठाण्यात कार्यरत असताना यांनी 'ऑपरेशन मुस्कान' मोहीम राबवत २४ वेठबिगारांची सुटका केली. केवळ सुटकाच नाही तर त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणत ते आज गुण्यागोविंदाने जगत आहेत. त्यांच्या आदर्शवत कामामुळे त्यांना अनेक सामाजिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अशा निर्भीड अधिकाऱ्याच्या विरोधात तथाकथित समाजसेवकांनी बदनामीची मोहीम उघडल्याने पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना सहानुभूती वाढली आहे. पोलिस पाटील संघटनेचे अनेक पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी वर्षानुवर्षे या 'टोळधाड' टोळीचे शिकार झालेले पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या समर्थनार्थ मोर्चा काढण्याच्या तयारीला लागले आहेत.

## भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने वर्षावास प्रवचन मालिकेची सुरुवात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेच्या वतीने वर्षावास प्रवचन मालिका २०२६ ची सुरुवात सावेडी गाव येथील बुद्ध विहारात उत्साहात करण्यात आली. कार्यक्रमात त्रिसरण, पंचशील ग्रहण आणि बुद्धपूजेनंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे यांनी वर्षावास प्रवचन मालिकेची अधिकृत घोषणा केली. प्रमुख प्रवचनकार तथा महिला जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड यांनी 'तथागत भगवान गौतम बुद्ध विश्वधम्मगुरू' या विषयावर मार्गदर्शन केले.

शहर सरचिटणीस लक्ष्मण माघाडे यांनी 'उपोसथ' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुद्ध अँड हिज धम्म' या पवित्र ग्रंथाच्या सामूहिक वाचनाचा शुभारंभ शहर संघटक राजेंद्र थोरात यांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक शहराध्यक्ष दिपक पाटोळे यांनी केले.

कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, महिला जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड, प्रचार–पर्यटन सचिव रवींद्र कांबळे, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, कार्यालयीन सचिव गौतम पाचारणे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, संस्कार उपाध्यक्ष युवराज बनसोड, संरक्षण सचिव बापू भिंगारदिवे, प्रचार–पर्यटन उपाध्यक्ष मोहन शिरसाट, संरक्षण उपाध्यक्ष मिलिंद घाटेशाही, कार्यालयीन सचिव विजय पाटोळे, संरक्षण सचिव विजय कांबळे, संघटक राजेंद्र थोरात, चव्हाण साहेब, अॅड. विद्या शिंदे, हर्षा पंचमुख, रेखा भिंगारदिवे, दिपा चव्हाण तसेच सदाशिव भिंगारदिवे, अॅड. किरण भिंगारदिवे, शारदा भिंगारदिवे, अलका भिंगारदिवे, सुनील भिंगारदिवे, राजू भिंगारदिवे, रंजना भिंगारदिवे, अजय भिंगारदिवे, विलास भिंगारदिवे, शोभा भिंगारदिवे, वर्षा भिंगारदिवे, कौसल्याताई भिंगारदिवे, बेबी भिंगारदिवे यांच्यासह उपासक–उपासिका, महिला, युवक आणि बालक–बालिका उपस्थित होते.

# दिल्ली वेस परिसरातील खोदकाम तात्काळ थांबवा

## राज्य पुरातत्त्व विभागाचे श्रीगोंदा नगरपरिषदेला आदेश


■ छाया । विजय उंडे

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**
श्रीगोंदा शहरातील ऐतिहासिक दिल्ली वेस परिसरात सुरू असलेल्या कथित अनधिकृत खोदकामाची महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या नाशिक विभागाने गंभीर दखल घेतली आहे. दिल्ली वेस परिसरातील सुरू असलेले खोदकाम तात्काळ थांबवून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी तसेच केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल तातडीने सादर करावा, असे आदेश श्रीगोंदा नगरपरिषदेला देण्यात आले आहेत.

शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनने २९ जुलै रोजी दिलेल्या तक्रारीनंतर पुरातत्त्व विभागाने ही कारवाई केली. विभागाच्या नोटीसमध्ये दिल्ली वेसच्या पायथ्याशी जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम सुरू असल्याची माहिती प्राप्त झाल्याचे नमूद करण्यात आले असून, त्यामुळे स्मारकाच्या पाया व संरचनात्मक स्थैर्याला धोका निर्माण होण्याबरोबरच मूळ वास्तुरचनेचे अपरिवर्तनीय नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

पुरातत्त्व विभागाने स्पष्ट केले आहे की, दिल्ली वेस हे पुरातत्त्वीय, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असंरक्षित स्मारक असून, श्रीगोंदा शहराच्या इतिहासातील तसेच पानिपत युद्धाच्या स्मृतींशी निगडित महत्त्वाचा वारसा आहे. या स्मारकाला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू असल्याने त्याच्या मूळ स्वरूपाला बाधा पोहोचेल किंवा कोणतीही हानी होईल, अशी कृती अत्यंत गंभीर स्वरूपाची मानली जाईल, असेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

सन १९८२ च्या शासन परिपत्रकाचा उल्लेख करत पुरातत्त्व विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांवर ऐतिहासिक स्मारकांचे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले आहे. केंद्र, राज्य अथवा असंरक्षित स्मारकांच्या परिसरात कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या शासनाच्या सूचनांचीही आठवण करून देण्यात आली आहे.

दरम्यान, शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनने दिल्ली वेस परिसरातील खोदकाम तातडीने बंद करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. गेल्या पाच वर्षांपासून दिल्ली वेसचे जतन, संवर्धन आणि राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा यासाठी संस्था सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करत असल्याचे संस्थेने सांगितले.

सदर निवेदन देण्यासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशनचे कायदेशीर सल्लागार ॲड. गोरख कडूस यांच्यासह सचिन भोसले, सागर शिंदे, ईश्वर कोठारे आणि ॲड. महेश क्षीरसागर उपस्थित होते.

पुरातत्त्व विभागाच्या या नोटीसमुळे दिल्ली वेस परिसरातील खोदकाम प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, आता श्रीगोंदा नगरपरिषद व स्थानिक प्रशासन पुढे कोणती कारवाई करते, याकडे इतिहासप्रेमींसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# टाकळी ढोकेश्वर येथील बांडे मळ्यात गुरुपौर्णिमा उत्सव व शिष्यगण मेळावा उत्साहात संपन्न

**● पारनेर । वीरभूमी –**
रामदास भाऊसाहेब बांडे शिष्य मंडळाच्या वतीने टाकळी ढोकेश्वर येथील श्री भैरवनाथ मंदिर, बांडे मळा येथे गुरुपौर्णिमा उत्सव २०२६ आणि शिष्यगण मेळावा भव्य उत्साहात साजरा झाला.


■ छाया । भगवान गायकवाड

या मेळाव्यासाठी माजी जि. प. सदस्य राणीताई लंके, बाजार समितीचे संचालक अशोक कटारिया, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, कौन्सिलिंग सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, माजी सरपंच सुनीता झावरे, चेअरमन नारायणराव झावरे, जिल्हा प्रवक्ते राष्ट्रवादी मोहन रोकडे, अमोल उगले व भालेराव गुरुजी उपस्थित होते.

सकाळी शाहीर अण्णासाहेब चौरे, शाहीर शांताराम किनकर तसेच संगीतरत्न भाऊसाहेब आंधळे यांनी भक्तिमय भजन कार्यक्रम सादर केला. भजनांच्या गोड स्वरात संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले. त्यानंतर ह.भ.प. गोरक्षनाथ महाराज रोकडे (वडगाव सावताळ) यांचे प्रवचन झाले. दुपारी १ वाजता जागरण गोंधळ श्री. साकर ठाणगे आणि श्री. बाळासाहेब निवडुंगे व पार्टी यांनी सादर केला. पारंपरिक गोंधळाच्या सादरीकरणाने उत्सवाला वेगळीच रंगत आली.

गुरुपौर्णिमेनिमित्त राणीताई लंके यांच्या हस्ते असंख्य गरजवंतांना वस्त्र वाटप करण्यात आले. यावेळी अशोक गंगाराम चव्हाण, महेश धोंडीराम सर्वन (त्र्यंबकेश्वर), जालिंदर प्रभाकर वाबळे आणि महेश रामदास बांडे यांच्यावतीने महाप्रसाद देण्यात आला.

या कार्यक्रमासाठी सर्व पत्रकार मित्र, सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, चेअरमन, व्हाइस चेअरमन, सर्व संचालक मंडळ तसेच भैरवनाथ मित्र मंडळ, बनाई मित्र मंडळ, नवभारत मित्र मंडळ, समस्त बांडे परिवार आणि टाकळी ढोकेश्वर येथील सर्व ग्रामस्थ व शिष्यगण उपस्थित होते. रामदास बांडे महाराज यांनी आभार मानले.

# प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याला दिशा देण्याचे काम गुरु करतात

## ह.भ.प. रामदास दराडे । बाबुजी आव्हाड महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**● पाथर्डी । वीरभूमी–**
प्रत्येकाच्या आयुष्यातील अज्ञानाचा अंधार मिटवून त्यांना ज्ञानाचा प्रकाश देण्याचे काम गुरु करतात. भारतीय संस्कृतीमध्ये गुरु परंपरेला अनन्यसाधारण महत्व असून जीवनातील संघर्षमय काळात प्रत्येकाच्या पाठीमागे उभा राहणारा आईवडिलांनंतर गुरुच असतो. गुरुंप्रती आदर व्यक्त करणारी गुरुपौर्णिमा ही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग असून प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याला दिशा देण्याचे काम गुरु करतात असे प्रतिपादन श्री क्षेत्र भगवानगड येथील ह. भ. प. रामदास दराडे यांनी केले. ते येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित गुरुपौर्णिमा उत्सव कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, तर व्यासपीठावर दादा महाराज बडे, डॉ अशोक डोळस, डॉ भगवान सांगळे, पर्यवेक्षक प्रा सलीम शेख, प्रा शेखर ससाणे उपस्थित होते.


■ छाया । अनिल खाटेर

रामदास महाराज पुढे म्हणाले, महर्षी व्यास यांचा जन्मदिवस संपूर्ण भारतात गुरु पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. महर्षी व्यास यांना सर्व जगाचे गुरु मानले जाते. हजारो वर्षापूर्वी गुरुनी दिलेले ज्ञान ग्रंथरुपात आजही टिकून आहे. पूर्वी गुरुनी दिलेल्या ज्ञानाचा मोबदला घेतला जात नसे परंतु आज गुरूंचे ज्ञानदान हे एक व्यवसाय म्हणून पुढे आले आहे. कवळ्याप्रमाणे तीक्ष्ण दृष्टी, बगळ्याप्रमाणे एकाग्रता व स्वानाप्रमाणे डोळस निद्रा हे तीन गुण असणारा विद्यार्थी कधीही अपयशी होत नाही.

कनिष्ठ महाविद्यालयानेही गुरुपौर्णिमा साजरी केली. ह.भ.प. श्री उद्धव महाराज चन्ने यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय संस्कृतीतील गुरुंचे अनन्यसाधारण स्थान, नैतिक मूल्यांचे जतन, चारित्र्यनिर्मिती आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी गुरुंच्या मार्गदर्शनाची आवश्यकता यावर प्रभावी विचार मांडले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त, प्रामाणिकपणा आणि समाजाप्रती उत्तरदायित्व जोपासावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आनंद ससाणे, रूपाली कोरडे, सई बारगजे, तनुजा रोडे, सागर डमाळे, आकाश धनगर आणि प्रतीक्षा विभुते, भाग्यश्री शेळके, निकिता बर्डे, प्रियांका धोत्रे या विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व, गुरुंचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील स्थान तसेच शिक्षकांप्रती असलेली कृतज्ञता याविषयी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अशोक डोळस, सुत्रसंचालन पूनम डमाळे व सोनल भडके तर आभार शामल भाबड व नियती खेडकर यांनी मानले.

# नेदरलंडच्या शास्त्रज्ञांची चोंभूतला भेट

## सेंद्रिय शेती व कांदा साठवणुकीवर मार्गदर्शन

**● पारनेर । वीरभूमी –**
परदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि स्थानिक शेतकऱ्यांचे अनुभव यांची देवाणघेवाण करण्यासाठी नेदरलंड येथून आलेल्या शास्त्रज्ञांच्या पथकाने अलीकडेच चोंभूत गावाला विशेष भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी येथील प्रगतशील सेंद्रिय शेती गट आणि महिला स्वयं-सहाय्यता बचत गटांच्या सदस्यांशी संवाद साधत शेतीविषयक अडी-अडचणी जाणून घेतल्या. तसेच सेंद्रिय शेती, कांदा पीक व्यवस्थापन आणि कांदा साठवणुकीच्या वैज्ञानिक पद्धतींवर सविस्तर मार्गदर्शन केले.


■ छाया । भगवान गायकवाड

चोंभूत येथे पार पडलेल्या या महत्त्वपूर्ण चर्चासत्राचे आयोजन कुकडीमाई महिला स्वयं-सहाय्यता गट, हिरकणी महिला स्वयं-सहाय्यता गट आणि कुकडी व्हिजन सेंद्रिय शेती गट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या कार्यक्रमाला कृषी व ग्रामीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या 'बायफ' आणि 'आयटीसी मिशन सुन्हारा कल' या सामाजिक संस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. परिसरातील शेतकरी आणि महिला वर्ग या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या चर्चासत्रात नेदरलंडहून आलेल्या परदेशी शास्त्रज्ञ डॉ. इरमा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्यासह केईए फाउंडेशन तर्फे डॉ. रुचिका सिंग, रिटोजा बासू, मानसी शहा, सुरमी काली, श्वेता लांबा, नित्या शर्मा, गणेश बेंद्रे यांनीही शेतीविषयक विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

तज्ज्ञांनी आपल्या मार्गदर्शनात खालील मुद्द्यांवर विशेष भर दिला रासायनिक खतांचा अतिवापर टाळून मातीची सुपीकता कशी टिकवावी, याबाबत आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली. पर्यावरणाचा समतोल राखून कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घेता येईल, यावर भर देण्यात आला. कांदा पिकाची जोपासना करताना घ्यावयाची काळजी आणि कीड-रोग नियंत्रणाचे उपाय समजून सांगितण्यात आले.

कांद्याची प्रत टिकवून ती योग्य रीतीने कशी साठवावी, जेणेकरून बाजारभाव मिळेपर्यंत नुकसान होणार नाही, याबाबतचे विविध तांत्रिक उपाय सुचवण्यात आले. शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग आणि अनुभव कथन

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात परिसरातील शेतकरी आणि महिलांनी आपल्या शेतीविषयक समस्या, आव्हाने आणि आतापर्यंतचे अनुभव मोकळेपणाने मांडले. कांदा लागवड, साठवणूक आणि बाजारातील उपलब्धता यासंबंधी आलेल्या अडचणींवर उपस्थितांनी चर्चा केली.

उपस्थित तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या सर्व शंकांचे निरसन करत शेती अधिक शाश्वत, नफ्याची आणि फायदेशीर बनवण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक सूचना केल्या. या मार्गदर्शनामुळे चोंभूत परिसरातील शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण असून, भविष्यात सेंद्रिय शेतीकडे अधिक वेगाने वळण्याचा निर्धार येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. हा दौरा चोंभूतच्या कृषी विकासासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला आहे.

# अभिनव शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आषाढी एकादशी पालखी सोहळा उत्साहात संपन्न

**● अकोले । वीरभूमी–**
अभिनव शिक्षण संस्थेच्या प्रांगणात आषाढी एकादशी पालखी सोहळा अत्यंत भक्तिमय, उत्साहपूर्ण आणि संस्कारमय वातावरणात संपन्न झाला. या निमित्ताने आयोजित विविध सांस्कृतिक, आध्यात्मिक व शैक्षणिक कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरा, भारतीय संस्कृती आणि जीवनमूल्यांचा सुंदर संगम साकारत उपस्थितांची मने जिंकली.


■ छाया । विद्याचंद्र सातपुते

आषाढी एकादशी निमित्त आयोजित पालखी सोहळ्याची सुरुवात प्रमुख अतिथी ह.भ.प. विठ्ठलपंत गोंडे महाराज, सद्गुरू यशवंतबाबा देवस्थान ट्रस्ट, राममाळ, उंचखडक, एकनाथ शिंदे, अभिनव शिक्षण संस्थेचे सचिव विक्रम नवले,कोषाध्यक्ष तथा कॅम्पस डायरेक्टर प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, सहसचिव प्राचार्या अल्फोन्सा डी. उपप्राचार्या राधिका नवले यांच्या हस्ते पालखी पूजनाने झाली. वसुंधरा अकॅडेमीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची भक्तिमय परंपरा जिवंत करणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. नृत्य शिक्षक प्रशांत दिवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा या गीतावरील नृत्यनाटिका सादर करण्यात आली. तसेच प्रशांत दिवेकर व संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पिंगळा महाद्वारी, मल्हारीची वारी, शिवारायाच्या छायेखाली आणि कानडा राजा पंढरीचा या भक्तिगीतांच्या सादरीकरणाने संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला.

पारंपरिक रिंगण सोहळ्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी वारी चुकायची नाही आणि दिगंबरा दिगंबरा या सादरीकरणांद्वारे उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. या विद्यार्थ्यांना नृत्य शिक्षिका काव्या कदम व संगीत शिक्षक राम आहेर यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी आकाशात सूर्याभोवती तयार झालेल्या इंद्रधनुष्याच्या रूपात जणू काही पंढरीचा पांडुरंगच कार्यक्रमाला उपस्थित असल्याचा भास झाला.

यावेळी प्रमुख अतिथी भागवताचार्य ह.भ.प. विठ्ठलपंत महाराज गोंडे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून श्रद्धा, सेवा, समता आणि संस्कारांचा महोत्सव आहे. वारकरी संप्रदायातून शिस्त, संयम, एकता आणि मानवतेचे संस्कार जोपासले जातात. शिक्षणासोबत असे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे ही काळाची गरज असून भावी पिढीसाठी ते अत्यंत प्रेरणादायी ठरतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसुंधरा अकॅडमीच्या सोनिया कोल्हे व मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूलच्या अश्विनी काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन हेमंत मंडलिक यांनी केले.